# महाराष्ट्र शासन

## आयुक्त, शिक्षण यांचे कार्यालय

बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११००४

e-mail : paeducomr@gmail.com Website: www.education.maharashtra.gov.in

दूरध्वनी : 020/25716336 25716398


जा.क्र.स्वीस/आशि/स्वविस्वम/टेक्र.१०६/१७-१८/ 9 L94

दिनांक:- २१ /०३/२०१७

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जिल्हा परिषद (सर्व)**

**विषय :** स्वच्छ विद्यालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्याबाबत ...

**संदर्भ :** १) शाळांमध्ये मुलभूत सुविधाबाबतचे निकष ठरविण्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक :एसएसए-२०१३/प्र.क्र.७५/ प्राशि-४, दिनांक २९ जुन, २०१३.

२) स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय अभियानाची हस्तपुस्तिका : सप्टेंबर २०१४

३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत उद्योजकांचे सामाजीक उत्तरदायित्व Corporate Social Responsibility (CSR) उपक्रमाबाबत धोरण निश्चितीबाबतचा शासन निर्णय : सीएसआर-२०१४/प्र.क्र.२८/पापु-०८ दिनांक १९ नोव्हेंबर,२०१४

४) संचालक, स्वच्छ भारत मिशन(ग्रामीण) यांनी दिनांक १८ डिसेंबर २०१४ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना क्र.एफ.क्र.डब्लू.११०१३/१६/२०१४ -

५) संचालक, मध्यान्न भोजन, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १३ फेब्रुवारी २०१५ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना क्र. एफ.क्र.१४-२/२०१३-ईई.५(एमडीएम-१-२)

६) राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ % निधी थेट देण्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक : पेसा - २०१५/प्र.क्र.१९/का.१७ दिनांक २१ एप्रिल,२०१५

७) “स्वच्छ विद्यालय, स्वच्छ महाराष्ट्र” मोहिम व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ रोजीचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण -२०१५/प्र.क्र.२७७/एस.डी.४.

८) १४ व्या वित्त आयोगाच्या निर्देशानुसार "आमचा गाव, आमचा विकास" उपक्रमांतर्गत ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक: जीपीडीपी -२०१५ /प्र.क्र.३८ /पं.रा-६, दिनांक ४ नोव्हेंबर २०१५

९) मा.अवर सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १३ एप्रिल २०१६ रोजीचे सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांना १४ व्या वित्त आयोगाच्या निधी संदर्भात पाठविलेले तातडीचे पत्र क्र.एफ. २७-९७/२०१५- ईई.१६.

१०) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांनी जारी केलेली मासिक पाळी व्यवस्थापनबाबत राज्य मार्गदर्शिका मे, २०१६.

११) संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान सुधारीत मार्गदर्शक सूचना, शासन निर्णय क्र. संगाग्रा-२०१६ /प्र.क्र.७२/पा.पु.८ दिनांक ०४ / जून /२०१६.

१२) मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग यांचे हागणदारीमुक्त, ग्रामपंचायतीची व्याख्या करणेबाबतचे पत्र दिनांक १७/०६/२०१६ रोजीचे पत्र क्र. वासो-३ /०६१५ / प्र.क्र.२३

१३) स्वच्छ विद्यालय पुरस्काराबाबत महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र. क्र.(९५/१६)एस.डी.-६ दिनांक १ जुलै २०१६.

१४) विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळेत घ्यावयाची १२ सत्रे याबाबत शासन परिपत्रक क्रमांक क्र. संकीर्ण /प्र.क्र.(९५/१६)एस.डी-६,दिनांक १४ ऑक्टोबर २०१६.

१५) या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.स्वीस/आशि/टेक्र.१०६/१७-१८/११८७ दिनांक ४ मार्च २०१७ नुसार झालेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेत झालेली चर्चा व निर्णय.

**पार्श्वभूमी:-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केल्यानुसार भारत सरकारने सप्टेंबर २०१४ मध्ये 'स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय' या राष्ट्रीय अभियानाची सुरुवात केली आहे . त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. ७ नुसार "स्वच्छ विद्यालय, स्वच्छ महाराष्ट्र" मोहिमेस सुरुवात केलेली आहे. त्याच्या अंमलबजावणीबाबत काही जिल्ह्यांतून मार्गदर्शन मागविण्यात आले होते, त्यानुसार पुढील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## अ) स्वच्छ विद्यालय, स्वच्छ महाराष्ट्र टास्कफोर्स :-

स्वच्छ विद्यालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने राज्यस्तरावर "स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय " कक्ष स्थापन करण्यात आला आहे. जिल्हास्तरावर आपण त्याच पद्धतीने एक "स्वच्छ विद्यालय, स्वच्छ महाराष्ट्र टास्कफोर्स ( Swachh Vidyalay , Swachh Maharashtra Task Force ) स्थापन करावा. याची रचना पुढीलप्रमाणे असावी :

| | | |
|---|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी | - | टास्क फोर्सचे अध्यक्ष |
| २. शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) | - | सदस्य |
| ३. कार्यकारी अभियंता- सर्व शिक्षा अभियान | - | सदस्य |
| ४. लिंग समभाव समन्वयक | - | सदस्य |
| ५. एक क्रियाशील शिक्षक ( पुरुष ) | - | सदस्य |
| ६. एक क्रियाशील शिक्षक ( महिला ) | - | सदस्य |
| ७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)-टास्कफोर्स प्रमुख | - | सदस्य सचिव |

टास्कफोर्समधील शिक्षकांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी. ही निवड करताना ज्या शिक्षकांनी शालेय स्वच्छतेसाठी उपक्रम राबविले असतील, किंवा ज्या शिक्षकांची स्वयंस्फुर्तीने काम करण्याची इच्छा आहे, अशांना प्राधान्य देण्यात यावे. या टास्कफोर्सवर जिल्ह्यातील संपूर्ण अभियानाच्या अंमलबजावणीची जबाबदारी असेल. या टास्कफोर्सच्या बैठका दर महिन्यास होतील व त्यात नियोजन, अंमलबजावणी, निधीची उपलब्धता आणि कार्य पूर्तीचा आढावा यांवर विशेष भर देण्यात यावा. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या टास्कफोर्सचा आढावा घेणे व मार्गदर्शन करून दिशा देणे अवश्यक आहे. दिनांक १५ एप्रिल २०१७ पर्यंत सदर टास्कफोर्सची माहिती नांवासहीत या कार्यालयास सादर करावी.